महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६३ वे | दिनांक : १९/०९/२०२६ | वार : शनिवार

## मोदींच्या वाढदिवसावरून राऊतांचा भाजपवर घणाघात; म्हणाले, 'सरकारचा कठीण काळ सुरू'



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७५ वा वाढदिवस नुकताच साजरा झाला. या निमित्ताने भाजपकडून देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मोदी आणि भाजपवर जोरदार निशाणा साधला आहे. "अशुभ काळाची चाहूल लागल्यामुळेच सत्तेच्या स्थैर्यासाठी आणि मोदींना ऊर्जा मिळण्यासाठी भक्तांना आशिर्वादाचे दिवे लावायला सांगितले जात आहे. पण दिवे लावा, काहीही करा... ग्रह कधीच रजेवर जात नाहीत!", असा खोचक टोला राऊत यांनी लगावला आहे. संजय राऊत यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत भाजपच्या आध्यात्मिक कार्यक्रमांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले की, "भाजपने आवाहन केले की मोदींच्या वाढदिवशी दिवे पेटवा. काही ठिकाणी गणेशोत्सवात आरती आणि महाआरतीचे आयोजन झाले. यज्ञ आणि होमहवन केले गेले. हे सर्व कशासाठी? तर मोदी यांना पुढच्या काळासाठी ऊर्जा मिळावी म्हणून. अचानक असे काय झाले की मोदींसाठी आशिर्वादांचे दिवे पेटवण्याचे फर्मान सुटले?" संजय राऊत म्हणाले, मी ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक आहे पण अंधश्रद्धाळू नाही, असे म्हणत त्यांनी काही ज्योतिषशास्त्रीय दाखले दिले. त्यांच्या दाव्यानुसार, मोदींची पुढील ग्रहदशा त्यांना सत्तेच्या राजयोगापासून दूर नेणारी आहे. १७ सप्टेंबरला सूर्य कन्या राशीत प्रवेश करतोय आणि १८ सप्टेंबरला मंगळ कर्क राशीत जातोय, जिथे तो नीच स्थानी (कमजोर) असतो. राऊत यांच्या मते, हा कमजोर मंगळ सरकार आणि सत्तेला सुरंग लावेल, तसेच संघर्ष आणि तीव्र आंदोलनाचा माहोल तयार करून राजकीय भूकंपाचे धक्के देईल. सध्याची ग्रहदशा आजच्या राज्यकर्त्यांसाठी अशुभ असल्याचे सांगत राऊत यांनी म्हटले आहे की, "देशात असंतोषाचा मोठा भडका उडेल. आंदोलने होतील. आंतरराष्ट्रीय कारस्थानांचा फटका बसेल. अंतर्गत बंडाळी वाढेल आणि त्यात सत्तापरिवर्तनही घडू शकते." या सर्व अशुभ काळाची चाहूल लागल्यामुळेच गेल्या बारा वर्षांत पहिल्यांदाच अशा प्रकारे दिवे लावायला सांगितले जात असल्याचा दावा त्यांनी केला. पोस्टच्या शेवटी राऊत यांनी म्हटले आहे की, "१७ तारखेपासून कठीण काळ सुरू होत आहे. ग्रहदशा कुणालाही बदलता येत नाही. दिवे लावा, काहीही करा... ग्रह कधीच रजेवर जात नाहीत, ते सदैव ड्युटीवर असतात." मोदींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांनी आपली पोस्ट 'जय महाराष्ट्र'ने संपवली आहे.

*पंतप्रधान मोदींचा ७५ वा वाढदिवस साजरा झाला. ते आता ७६ वर्षांचे झाले. त्यांना उत्तम दीर्घायुष्य लाभो. विषय थोडा वेगळा आहे. भाजपने आवाहन केले की मोदींच्या वाढदिवशी दिवे पेटवा.(त्यासाठी लाखो लिटर तेल,कापूर आणि माचीस बॉक्स ची व्यवस्था करण्यात आली)काही ठिकाणी गणेशोत्सवात आरती आणि महाआरतीचे आयोजन झाले. यज्ञ आणि होमहवन केले गेले.का? तर मोदी यांना पुढच्या काळासाठी ऊर्जा मिळावी म्हणून अनेक आध्यात्मिक कार्यक्रम राबवले. अचानक असे काय झाले?की मोदींसाठी आशिर्वादांचे दिवे पेटवण्याचे फर्मान सुटले? विषय थोडा वेगळा आहे. मी ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक आहे. पण अंधश्रद्धाळू नाही. १७ सप्टेंबर मोदींचा जन्मदिवस आहे. मोदींच्या पुढील ग्रहदशा त्यांना सत्तेच्या राजयोगापासून दूर नेणारी आहे. १७ सप्टेंबरला सूर्य कन्या राशीत प्रवेश करतोय. १८ सप्टेंबरला मंगळ कर्क राशीत जातोय. कर्क राशीत मंगळ नीच स्थानी असतो. म्हणजे कमजोर होतो. हे सोप्या भाषेत सांगायचे तर हा कमजोर मंगळ दोन गोष्टी नक्की घडवतो: • सरकार आणि सत्तेला धक्का देतो, सुरंग लावतो. • संघर्ष आणि तीव्र आंदोलनाचा माहौल तयार करतो.राजकीय भूकंपाचे धक्के देतो, नीच स्थानातला हा मंगळ सत्तेच्या दहाव्या भावाकडे पाहतो. संघर्षाच्या सहाव्या भावाकडे पाहतो. आणि त्या सहाव्या भावाचा स्वामी शुक्राकडेही पाहतो. दहाव्या भावात राहू बसला आहे. हा योग आजच्या राज्यकर्त्या टोळ्यांसाठी अशुभ आहे. त्यामुळे काय होईल? देशात असंतोषाचा मोठा भडका उडेल. आंदोलने होतील. आंतरराष्ट्रीय कारस्थानांचा फटका बसेल. अंतर्गत बंडाळी वाढेल,त्यात सत्तापरिवर्तनही घडू शकते. या अशुभ काळाची चाहूल लागल्यामुळे गेल्या बारा वर्षांत पहिल्यांदाच सत्तेच्या स्थैर्यासाठी आणि मोदींच्या आरोग्यासाठी भक्तांना आशिर्वादाचे दिवे लावायला सांगितले जात आहे. त्यातून मोदींना ऊर्जा मिळेल, असे सांगितले जात आहे. १७ तारखेपासून कठीण काळ सुरू होत आहे. ग्रहदशा कुणालाही बदलता येत नाही. दिवे लावा, काहीही करा... ग्रह कधीच रजेवर जात नाहीत! होय ग्रह कधीच सुट्टीवर जात नाहीत ते सदैव ड्यूटी वर असतात पंतप्रधान मोदी यांना शुभेच्छा! जय महाराष्ट्र!*

## ठाकरेंनी डायलॉगबाजी करू नये; ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळावर निर्णय - शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** उद्धव ठाकरे यांना प्रशासनाबद्दल काहीही माहिती नाही. काही गोष्टींच्या विशिष्ट गाईडलाईन्स ठरलेल्या असतात. सत्तेत असताना जे काही देऊ शकले नाहीत, ते आता केवळ बोंबलण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी उगाच डायलॉगबाजी करू नये, असे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून दुष्काळाबाबत ५ ऑक्टोबरनंतर मुख्यमंत्री भरीव मदतीची घोषणा करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, पाऊस न झाल्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेती पिकांचे मोठे नुकसान झाले असून दुबार पेरणीचाही फायदा होणार नाही, असे वातावरण आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये आढावा बैठक घेतली आहे. राज्य सरकार मदत जाहीर करू शकते; पण केंद्र सरकारकडून भरीव मदत आली तरच शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो. केंद्र सरकारची मदत घेण्यासाठी ठराविक तारखा आणि प्रक्रियेचे पालन करावे लागते. सरकार या विषयाकडे अत्यंत गांभीर्याने पाहत आहे. मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, दिशा सालियान प्रकरणात ठाकरेंचा संबंध आहे की नाही यावर आम्ही बोलत नाही. हायकोर्टाने सीबीआय चौकशीचे निर्देश दिले आहेत आणि दिशा सालियान यांच्या वडिलांच्या जबाबात नाव आहे. आदित्य ठाकरे निर्दोष असतील तर ते या प्रकरणातून सुटतील. आम्ही कोणालाही मुद्दाम त्रास देत नाही. तसेच संजय राऊत यांच्या वक्तव्यांमुळे कदाचित आदित्य ठाकरे अधिक अडचणीत येऊ शकतात, असा टोलाही त्यांनी लगावला. छत्रपती संभाजीनगरमधील कन्नड आणि सिल्लोड परिसरात झालेल्या मुसळधार पावसात वीज पडून काही शेतमजुरांचा मृत्यू झाला. या अत्यंत गरीब कुटुंबांना १ ते २ दिवसांत तातडीने मदत पोहोचवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच या दुर्घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकार करणार असल्याची माहिती शिरसाट यांनी दिली.

## मोदी-शहा शिंदेंच्या पक्षाचे नेते; राऊतांचा निवडणूक आयोगावर निशाणा

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच वास्तविक एकनाथ शिंदे यांच्या गटाचे खरे नेते आहेत. त्यांच्या पक्षाचे मुख्य कार्यालय गुजरातमध्ये असून, पक्षाचे नेते गुजराती आहेत. त्यामुळे त्यांना खूश करण्यासाठीच एकनाथ शिंदे गुजराती भाषेत बोलले असावेत, असा टोला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे. संजय राऊत म्हणाले की, अमित शहा यांना उत्तम मराठी येते आणि नरेंद्र मोदी यांना तर एकनाथ शिंदेंपेक्षाही चांगले मराठी येते. तरीही त्यांना प्रसन्न करण्यासाठी शिंदे तिकडच्या भाषेत बोलले असतील, तर त्यात नवल नाही. कारण त्यांच्या पक्षाची घटनाच मुळात गुजराती आहे. संजय राऊत म्हणाले की, देशाचा निवडणूक आयोग गेल्या १० ते १२ वर्षांपासून अमित शहा यांच्या घरगड्यासारखा काम करत आहे. याच दबावाखाली बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या मूळ शिवसेनेला निवडणूक आयोगाकडून न्याय मिळाला नाही. इतकेच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडूनही न्याय मिळाला नाही. मूळ राजकीय पक्षाचा प्रवाह सुरू राहिला पाहिजे आणि त्याचे अस्तित्व टिकले पाहिजे, परंतु शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह शिंदे गटाला देणे हा या दशकातील सर्वात मोठा घोटाळा आहे. हा संपूर्ण प्रकार प्रचंड दबाव आणि प्रलोभनातून घडवून आणला गेला असून, हा शेकडो कोटींचा घोटाळा आता जनतेच्या समोर येत आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६


# बीडचा सर्वांगीण विकास साधणार: उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार



**बीड (भगवंत पाळवदे) :** मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या निमित्ताने आज बीड येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण मोठ्या उत्साहात पार पडले. मराठवाड्याच्या लढ्यात बीड आणि अंबेजोगाईचा मोठा वाटा राहिला असून, या ऐतिहासिक भूमीचा चेहरामोहरा बदलून 'सुदृढ, सुशिक्षित, समृद्ध आणि सुरक्षित बीड' घडवण्याचा संकल्प पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी व्यक्त केला.या शासकीय कार्यक्रमापूर्वी उपमुख्यमंत्री पवार यांनी हुतात्मा स्मारकाला भेट देऊन हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करत आदरांजली वाहिली. तसेच उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, त्यांचे कुटुंबीय आणि शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांची आपुलकीने भेट घेतली. यावेळी व्यासपीठावर आ. विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलता पारवे यांच्यासह उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.इतिहासाचे स्मरण आणि हुतात्म्यांना अभिवादनध्वजारोहणानंतर जनतेला संबोधित करताना पालकमंत्री पवार यांनी राज्यातील १३ कोटी जनतेच्या वतीने मुक्तीसंग्रामातील हुतात्मा वीरांना व स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. हा लढा केवळ मराठवाड्यापुरता मर्यादित नव्हता, तर त्यात तेलंगणा व कर्नाटक मुक्तीसाठी योगदान देणाऱ्या वीरांचाही सहभाग होता, असे सांगत त्यांनी त्यांनाही वंदन केले. आजच्या या मंगलदिनी गणेशोत्सव आणि महालक्ष्मी सणाचे पर्व सुरू असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस असल्याने बीडकरांच्या वतीने त्यांनी पंतप्रधानांना शुभेच्छा दिल्या.१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल १३ महिने २ दिवसांनी, म्हणजेच १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाला. या स्वातंत्र्यासाठी जनतेला सशस्त्र लढा द्यावा लागला व रक्त सांडावे लागले. आपले वडील कै. बाजीराव पाटील हे स्वतः या संग्रामात मुक्तिसैनिक म्हणून सहभागी झाले होते, हा आपल्यासाठी अत्यंत अभिमानाचा वारसा असल्याचे सांगताना त्या भावुक झाल्या.स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील या लढ्याचा बीड व अंबेजोगाई हा केंद्रबिंदू होता. हा लढा केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नसून शिक्षण, स्वाभिमान व लोकशाही मूल्यांसाठी होता, असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी विठ्ठलराव काटकर यांचा गनिमी कावा, डॉ. ताराबाई परांजपे, कॉम्रेड करुणा चौधरी, प्रमिला कुलकर्णी, प्रतिभाताई वैशंपायन यांचे योगदान, रझाकारांविरुद्ध शहीद झालेल्या गोदावरीबाई टेके आणि पुरुषवेशात लढणाऱ्या दगडाबाई शेळके यांच्या अतुलनीय शौर्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. धारूरचे हुतात्मा काशिनाथ बच्चाळकर, बीडचे हुतात्मा वसंत राक्षसभुवनकर यांच्यासह जिल्ह्यातील २२ हुतात्म्यांच्या बलिदानाचे व पुरुषोत्तमराव चपळगावकर, रामभाऊ स्वामी आणि काशिनाथराव जाधव यांच्या नेतृत्वाचेही त्यांनी स्मरण केले. हा इतिहास केवळ स्मरण करण्यापुरता नसून पुढील पिढीला प्रेरणा देणारा असल्याचे त्या म्हणाल्या.पायाभूत सुविधा, सांस्कृतिक व क्रीडा प्रकल्पांना गतीबीड जिल्ह्याच्या विकासाला गती देणाऱ्या अनेक प्रकल्पांची माहिती पालकमंत्र्यांनी दिली: * रेल्वे सेवा: गतवर्षी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड-अहिल्यानगर रेल्वेचे उद्घाटन करताना बीडकरांना पुण्याला रेल्वेने जाण्याचे वचन दिले होते. ते वचन पूर्ण करत आज पुण्याला जाणाऱ्या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. * सांस्कृतिक विकास: यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे आणि मुलांना विज्ञानाची ओळख करून देणाऱ्या अत्याधुनिक तारांगणाचे आज भूमिपूजन होणार असल्याचे त्यांनी सांगितले. * तीर्थक्षेत्र व शिक्षण: परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी ३०१ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्याला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तसेच, परळीत ५६५ कोटी रुपये खर्चून ४१ हेक्टरवर उभारलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे गेल्याच महिन्यात उद्घाटन झाले आहे. * क्रीडा क्षेत्र: क्रीडा संकुलाच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, ऑलिम्पिक पदकविजेते स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा यंदा बीडमध्ये होणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली.कृषी, आरोग्य आणि कल्याणकारी योजनांचा आढावाबीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांचा सविस्तर आढावा सुनेत्रा पवार यांनी घेतला: * शेती व सिंचन: अल-निनोमुळे पावसाची स्थिती समाधानकारक नसली तरी प्रशासनाला आवश्यक पाहणीच्या सूचना दिल्या असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत सुमारे ६७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ४९१ कोटी रुपये जमा करून सातबारा कोरा करण्यात आला आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात ४०० गावांची निवड झाली आहे. तर आष्टी उपसा सिंचन योजनेमुळे १.६८ टीएमसी पाणी उपलब्ध होऊन २६ गावांतील ८,१४७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. * रोजगार व निधी: २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यात जवळपास १४,७६५ कामांतून सुमारे दीड कोटी मनुष्यदिवस रोजगार निर्माण झाला असून, यंदा ६२३ कोटी रुपयांचा जिल्हा नियोजन निधी उपलब्ध झाला आहे. 'महाराजस्व समाधान शिबिरां'मधून १ लाख ४० हजारांहून अधिक नागरिकांना थेट लाभ मिळाला आहे. * आरोग्य व सामाजिक न्याय: आरोग्य क्षेत्रात मोतीबिंदू शस्त्रक्रियांमध्ये १६० टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे. 'मिशन साथी'अंतर्गत ऊसतोड कामगारांना आरोग्य सुविधा व आयुष्मान कार्ड दिली जात आहेत. त्यांच्या मुलांसाठी राज्यातील पहिले 'संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह' गेल्या महिन्यात सुरू करण्यात आले. * लाडकी लेक व कुणबी प्रमाणपत्र: 'लेक लाडकी' योजनेतून साडेसात हजारांहून अधिक लाभार्थींना आर्थिक मदत मिळाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख ११ हजारांपेक्षा अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाले असून हैदराबाद गॅझेटर आधारित ५५४ अर्जांवर १०० टक्के कारवाई पूर्ण झाली आहे.बीड जिल्हा विकासाच्या नव्या वाटेवर असून 'सुदृढ, सुशिक्षित, समृद्ध आणि सुरक्षित बीड' घडवण्यासाठी सर्व बीडकरांनी खंबीर साथ द्यावी, असे आवाहन करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सर्वांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## ओझोनच्या संरक्षणाचा संदेश; इकरा पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची पोस्टरमधून जनजागृती



**जळगाव :** जळगाव येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये ओझोन दिन मोठ्या उत्साहात आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन आणि ओझोन थराच्या संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी शाळेतील ६२बालवैज्ञानिकांनी माहितीपूर्ण व आकर्षक पोस्टर्स तयार करून आपल्या कल्पकतेला व्यासपीठ दिले.विज्ञान विभागाचे प्रमुख इश्तियाक अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ओझोन थराचे महत्त्व,त्यासमोरील धोके, पर्यावरणीय संकटे आणि मानवी कृतींमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर आधारित पोस्टर सादरीकरण केले. आरीफ खान सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी विज्ञान विभागप्रमुख इश्तियाक अहमद यांनी विद्यार्थ्यांना ओझोन दिनाचे महत्त्व समजावून सांगताना मानवनिर्मित पर्यावरणीय संकटांमुळे ओझोन थरावर निर्माण होणाऱ्या परिणामांची माहिती दिली. पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि पृथ्वीच्या संरक्षणासाठी जबाबदार नागरिक म्हणून योगदान देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि वैज्ञानिक जिज्ञासेला प्रोत्साहन देण्यासाठी शाळेत भव्य पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देत पोस्टर्सची पाहणी केली आणि बालवैज्ञानिकांच्या कल्पकतेचे कौतुक केले.विज्ञान विभागाकडून सादर केलेल्या पोस्टर्समधून उत्कृष्ट तीन पोस्टर्सची निवड करून विजेत्यांना पारितोषिक देण्यात येणार आहे.या उपक्रमाचे मुख्याध्यापक शेख शकील यांनी कौतुक करत विज्ञान विभागाचे अभिनंदन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणाविषयी संवेदनशीलता आणि सर्जनशीलता विकसित होते, असे त्यांनी नमूद केले.

## प्रबोधनकार ठाकरे जयंतीनिमित्त अभिवादन



*कॅप्शन : कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर.*

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.मुख्य ईमारतीत गुरुवारी हा कार्यक्रम झाला. यावेळी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, अभ्यासक डॉ.सुशील धसकटे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. कैलास अंभुरे यांच्यासह अधिष्ठाता, संवैधानिक अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६


## जिंतूर येथे भय्यासाहेब आंबेडकर यांना स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आले



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा जिंतूरच्या वतिने तालुकाध्यक्ष ॲड. रमेश भडगळ यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा सरक्षण सचिव मेजर महेंद्र बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितितभारतीय बौद्ध महासभेचे द्वितिय अध्यक्ष, बौद्धाचार्याचे जनक बाबासाहेबाचे पुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांना समृतिदिनी अभिवादन करण्यात आले व महाबोधी महाविहार आंदोलनाचे जनक अनागारिक धम्मपाल यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.बौद्धाचार्य शिवाजी लाटे सर आणि बौद्धाचार्य राजेन्द्र घनसावध यानी अनागारिक धम्मपाल आणि भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनावर भाषणाच्या माध्यमातून प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सुत्रसचालन बौद्धाचार्य आनदराव वाकळे यानी तर आभार प्रदर्शन पांडुरंग सूर्यवंशी यानी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी माजी तालुकाध्यक्ष मोहनभाऊ घनसावध,पत्रकार राजाभाऊ काळे, स्वप्निल रायबोले, डॉ. हरिभाऊ घनसावध, अशोकराव वानखेडे,युवराज घनसावध, सतिष अंभोरे, दिपक मोरे, व इतर यानी सहकार्य केले

## वादविवाद स्पर्धेत भगवान विद्यालय आडगाव बु. ची विद्यार्थ्यांनी कु.दिव्या लोंखडे व्दितीय

**आडगाव बु. :** येथील भगवान विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थिनी कुमारी दिव्या कमळाकर लोखंडे हिने राष्ट्रीय हिंदी विद्यालय येथे पार पडलेल्या वादविवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे त्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्राकृतिक हा आपदाओ के लिए जिम्मेदार कोण मानव या प्राकृती या विषयावर तिने वाद विवाद स्पर्धेत भाग घेतला होता या स्पर्धेत तिला सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला या प्रसंगी भगवान महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर राजीव वाघ यांनी तिचे अभिनंदन केले आहे तसेच भगवान विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील नागरिक यांनी तिच्या या यशाबद्दल तिचे कौतुक केले आहे.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील तीन संशोधकांना पेटंट मंजूर



**उमरगा :** भारत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील प्राध्यापकांच्या संशोधनकार्याला उल्लेखनीय यश मिळाले असून डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी यांना दोन, तर डॉ. व्ही. डी. देवरकर आणि डॉ. ए. एस. पदमपल्ले यांना प्रत्येकी एक पेटंट प्राप्त झाले आहे. यापैकी एक पेटंट भारतीय पेटंट प्राधिकरणाकडून, तर दुसरे यूके पेटंट प्राधिकरणाकडून मंजूर झाले आहे. या उल्लेखनीय उपलब्धीबद्दल महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व संशोधन आणि विकास कक्षाच्या वतीने प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.प्राध्यापकांच्या संशोधनवृत्तीला प्रोत्साहन देणारी ही कामगिरी असून महाविद्यालयाच्या संशोधनपरंपरेसाठी महत्त्वपूर्ण आहे. अध्यापनासोबतच नाविन्यपूर्ण संशोधन, तंत्रज्ञानविकास आणि समाजोपयोगी उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांचा वाढता सहभाग अधोरेखित करणारी ही उपलब्धी आहे. महाविद्यालयायीन पातळीवर हे अकरावे पेटंट असून भविष्यात सर्वच क्षेत्रात पेटंट मिळवण्यासाठी सर्व शाखांतील प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत असे आवाहन यावेळी प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी केले. प्राप्त पेटंटपैकी एक महत्त्वपूर्ण पेटंट "इंप्रूव्हड प्रोसेस फॉर प्रिपेरिंग नेफोपाम हायड्रोक्लोराइड बाइ सिलेक्टिव्ह लो टेम्परेचर मोनोटोसिलेशन अँड इन्सिटू एमिनेशन" या डॉ व्ही. एस. सूर्यवंशी (रसायनशास्त्र) यांच्या संशोधनासाठी मंजूर झाले आहे. नेफोपाम हायड्रोक्लोराइड हे तीव्र स्वरूपाच्या वेदना कमी करण्यासाठी वापरले जाणारे औषध आहे. शस्त्रक्रियेनंतरच्या वेदना, दाताच्या वेदना, स्नायू व हाडांच्या वेदना तसेच काही इतर तीव्र स्वरूपाच्या वेदनांच्या व्यवस्थापनामध्ये त्याचा उपयोग केला जातो. या औषधाच्या निर्मितीसाठी अधिक परिणामकारक, कमी टप्प्यांची आणि पर्यावरणपूरक असलेली रासायनिक प्रक्रिया विकसित करण्याच्या दृष्टीने सदर संशोधन करण्यात आले आहे. या सुधारित प्रक्रियेमुळे औषधनिर्मिती अधिक कार्यक्षम, तुलनेने कमी खर्चिक आणि पर्यावरणपूरक होणार आहे.या पेटंट मध्ये डॉ.सूर्यवंशी यांनी विविध आणि नाविन्यपूर्ण दहा बाबींचा दावा केला आहे. तसेच डॉ. सूर्यवंशी यांनी डॉ. व्ही. डी. देवरकर (वनस्पतीशास्त्र) आणि डॉ ए. एस. पदमपल्ले (भौतिकशास्त्र) यांच्या समवेत विकसित केलेल्या "पीएच रिस्पॉन्स मॅपिंग डिव्हाइस"लाही पेटंट मिळाले आहे. विविध प्रकारच्या पर्यावरणाच्या परिस्थितींमध्ये होणाऱ्या सामु/पीएच मधील बदलांचे मॅपिंग, त्याचे जलिय प्राणी तसेच वनस्पती जीवनावर होणारे परिणाम, पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेचे विश्लेषण, त्याबद्दल जागरूकता आणि उपचारासाठी हे उपकरण उपयुक्त ठरणार आहे. या उपकरणांमध्ये संकलित केलेल्या माहितीच्या आधारे वेगवेगळ्या भौगोलिक स्थानांमधील पाण्याची सामू/पीएच पातळी कशी बदलते, याचा अचूक मागोवा घेऊन, त्याचा आलेख, रंगीत नकाशा तयार करून जनजागृती व उपायांच्या आधारे जलप्रदूषण रोखण्यास मदत होणार आहे. या उपकरणाच्या विकासातून आंतरशाखीय संशोधनाचे महत्व अधोरेखित होते.या उल्लेखनीय यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोलराव मोरे, उपाध्यक्ष मा. अश्लेष मोरे, सरचिटणीस मा. जनार्धनराव साठे, चिटणीस मा. पद्माकराव हराळकर, सहचिटणीस डॉ. सुभाष वाघमोडे आणि सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन करून भविष्यातही महाविद्यालयातून अधिकाधिक नाविन्यपूर्ण संशोधन व पेटंटनिर्मिती व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक प्रा एस. ए. महामुनी, प्रभारी प्राध्यापक डॉ एस. पी. इंगळे, प्रा डी बी लोभे, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधिक्षक नितीन कोराळे, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.


MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI
MJ
NEWS

### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६


# कला महाविद्यालय बिडकीन येथे रेड रिबीन क्लबचे उद्घाटन




**बिडकीन :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालय बिडकीन येथे रेड रिबन क्लब (RRC) चे उद्घाटन अत्यंत उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आली तर नंतर पाहुण्यांचे स्वागत करून क्लबचे समन्वयक डॉ. रमेश गायकवाड यांनी प्रास्तावित केले त्यांनी क्लब स्थापने मागचा मुख्य उद्देश आणि वर्षभरात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थी विद्यार्थिनींना देण्यात आली तदनंतर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथीलसमुपदेशक संजय चौबे सर हे कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते त्यांनी "युवाशक्ती आणि आरोग्य" या विषयावर मार्गदर्शन केले त्यांनी एडस विषयीचे गैरसमज दूर करून सुरक्षित आरोग्यासाठी तरुणांची भूमिका किती महत्त्वाची आहे हे युवकांना पटवून दिले त्याचबरोबर युवकांनी स्वेच्छेने रक्तदानासाठी पुढे येणे गरजेचे आहे असे आवाहनही विद्यार्थ्यांना करण्यात आले. तर नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थी हा समाजाचा आरसा आहे रेड रिबन क्लबच्या माध्यमातून विद्यार्थी समाजात एक सजग नागरिक म्हणून जनजागृतीची मोठे कार्य करू शकततो म्हणून महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभागी व्हावे आणि समाज प्रबोधन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली तदनंतर विशेष उपक्रम म्हणजे शपथविधी प्रसंगी सभागृहातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थीनींनी एड्स निर्मूलन आणि आरोग्यदायी जीवनशैली बाबतची सामूहिक शपथ दिली विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रतिकात्मक रेड रिबन लाल फीत लावून मोहिमेचा अधिकृत प्रारंभ करण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्टुडन्ट आरआरसी एक्झिक्युटिव्ह कमिटी १) अध्यक्ष विशाल औटी २) उपाध्यक्ष :पायल कांबळे ३) सचिव : शुभम चौधरी ४) सहसचिव: सानिया शेख यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतिशय मेहनत घेतली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ.युसुफ पठाण डॉ .प्रसाद करंदीकर , डॉ.मुखत्यार शेख , डॉ.रामकिसन मुंडे, डॉ.अर्चना काटकर, डॉ.अंजली काळे, ग्रामीण रुग्णालय बिडकीन प्रयोगशाळा तंत्रज्ञ अंबादास राकडे त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचारी संभाजी आंधळे, अण्णासाहेब थिटे, कहीम शेख ,नसीर शेख तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.सय्यद मुजीब सरांनी केले आणि शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## पीक सारे करपून गेले

बी बियाणे पेरल्यावर,
शेतशिवार हिरवे केले.
अचानक दडी मारता,
पीक सारे करपून गेले. १

शेत सारे उभ्याने जळले,
मेघराजा तू धावून यावे.
बळीराजाचे ज्वलंत प्रश्न,
ताबडतोब सोडवून जावे. २

का असे निष्ठुर वागतो,
काय झाली माझी चुकी.
पीक सारे करपू लागता,
रडू लागली जनावर मुकी. ३

करपलेले शिवार पाहून,
सुचत नाही काहीच मला.
हात जोडून वंदन करतो
काकुळतेला येऊन तुला. ४

धाव धाव तू मेघराजा,
लेकरांची ऐकून हाक.
बळीराजाचे रुतून बसले,
दु:खात संसाराचे चाक. ५

मेघराजा तुझ्या कृपेने,
बळीचे संकट दूर व्हावे.
जगाच्या पोशिंद्याला तूच,
आता मायेने पदरात घ्यावे. ६




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं. ८८३०६३५६९१**







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६


## महिला शेतकऱ्यांसाठी योजनांचा मार्ग सुकर - रंगनाथ पिसाळ



**दौलताबाद (जावेद अहमद) :** महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने मौजे माळीवाडा येथे महिला शेतकरी प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन कार्यक्रम दि १८ शुक्रवारी घेण्यात आला. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी रंगनाथ पिसाळ यांनी उपस्थित महिलांना प्रमाणपत्राची पात्रता, आणि अर्ज प्रक्रियेबाबत सविस्तर अशी माहिती दिली. महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्जदार महिला १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची आणि संबंधित गावची रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच महिलेचा शेती किंवा शेतीशी संबंधित व्यवसायात प्रत्यक्ष सहभाग असणे आवश्यक आहे. जमीन स्वतःच्या नावावर असण्याची आवश्यकता नसल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. अर्जासाठी आधार क्रमांक, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक, जिल्हा, तालुका व गावाची माहिती तसेच महिला करत असलेल्या शेतीशी संबंधित कार्याची माहिती म्हणजेच कुकूटपालन, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग, शेतीशी संबंधित मशागतीचे कामे, मधुमक्षिका पालन, मत्स्य पालन, भाजीपाला, मसाला पिके, औषधी वनस्पती तसेच फळबाग लागवड यांसारखी शेतीवर आधारित कामे आवश्यक आहे. ज्या महिला कुटुंबातील सदस्याकडे घरात इतर कोणाकडे स्वतःची जमीन जर असेल तर Farmer -ID तर संबंधित ११ अंकी Farmer ID देऊन त्याची पडताळणी केली जाते. महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करून आधार क्रमांकाद्वारे OTPच्या माध्यमातून पडताळणी केली जाते. अर्ज सादर झाल्यानंतर तो संबंधित ग्रामपंचायत/नगरपंचायत स्तरावरील ग्रामसभा किंवा बैठकीसमोर ठेवण्यात येतो. येणाऱ्या ०२ ऑक्टोबर ग्रामसभेच्या ठरावानंतर पात्र महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल असे आश्वासित केले. शेतीशी संबंधित काम करणाऱ्या महिलांनी या 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' चा लाभ घेऊन शासनाच्या विविध कृषी योजना व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा "गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना", पिक विमा, विविध प्रकिया उद्योग कर्ज पुरवठा ,अशा अनेक उपलब्ध कृषी योजनांचा लाभ घेऊन महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी रंगनाथ पिसाळ यांनी केले. कार्यक्रमास माळीवाडा परिसरातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बीडच्या दुष्काळसदृश परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करा; शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीर - सुनेत्रा पवार



**बीड (भगवंत पाळवदे) :** "यंदा अल-निनोमुळे बीडसह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने मोठी ओढ दिली आहे. मी स्वतः एक शेतकरी असल्याने आणि मराठवाड्याची लेक असल्याने मला या भीषण परिस्थितीची व शेतकऱ्यांच्या वेदनांची पूर्ण जाणीव आहे. मात्र, बळीराजाने धीर सोडू नये, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, या टंचाईवर आपण सर्वजण मिळून एकत्रित मात करू," असा आशादायी विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज येथे व्यक्त केला. तसेच, सर्वांना परतीच्या पावसाची अपेक्षा असल्याचेही त्या म्हणाल्या.खरीप हंगाम आणि संभाव्य टंचाई परिस्थितीबाबत आज बीड येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. टंचाईच्या अनुषंगाने राज्य शासन अतिशय गंभीर असून कॅबिनेटच्या प्रत्येक बैठकीमध्ये यावर सविस्तर चर्चा होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मा. मुख्यमंत्री महोदयांनी यापूर्वीच गावपातळीवर नुकसानीचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, असेही त्यांनी नमूद केले.या बैठकीला खासदार बजरंग सोनवणे (ऑनलाईन), आमदार विक्रम काळे, आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.लोकप्रतिनिधींच्या महत्त्वपूर्ण मागण्या आणि उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश: * नुकसान भरपाई आणि पंचनामे: पावसाचा खंड २९ दिवसांचा नसून ३६ दिवसांचा असल्याचे आमदार सुरेश धस यांनी निदर्शनास आणून दिले. तर, पिकांचे ९० ते ९५% नुकसान झाल्याने एनडीआरएफच्या (NDRF) निकषांपेक्षा अधिक मदत देण्याची मागणी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी केली. खासदार बजरंग सोनवणे यांनी नुकसानीची मदत सरसकट मिळावी आणि मागील काळातील प्रलंबित मदतही तत्काळ देण्याची मागणी केली. यावर, प्रशासनाने पिकांच्या नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे अत्यंत वस्तुनिष्ठ आणि पारदर्शकपणे करून सविस्तर अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले. * पिण्याचे पाणी आणि टँकर्स: धरणांमधील उर्वरित पाणीसाठा केवळ पिण्यासाठीच राखीव ठेवावा आणि पाण्याचा अवैध उपसा तातडीने बंद करावा, असे कडक निर्देश देण्यात आले. भूजलाचे सातत्याने मोजमाप करावे आणि पिण्याच्या पाण्यासाठी जिथे गरज आहे तिथे टँकरचे प्रस्ताव विनाविलंब मंजूर करून टँकर तातडीने सुरू करावेत. टँकर भरण्यासाठी कृषी क्षेत्रातील खासगी विहिरी अधिग्रहित कराव्यात व नवीन विंधन विहिरी घ्याव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. * बीड शहर पाणीपुरवठा: बीड शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने प्रयत्न करावेत आणि पाणीपुरवठा योजनेची थकीत वीज बिले माफ करण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिले. * चारा टंचाई आणि चारा डेपो: आष्टी तालुक्यात रेकॉर्डनुसार चारा उपलब्ध नसून परिस्थिती गंभीर असल्याने यावर मदत व पुनर्वसन विभागाकडून चारा डेपो सुरू करण्याचा निर्णय त्वरित घेण्याचे निर्देश देण्यात आले. * जलसंधारण आणि धरणे: टंचाईच्या काळात जिल्ह्यात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावीत आणि स्वयंसेवी संस्थांच्या (NGOs) माध्यमातून प्रकल्पातील गाळ काढण्याचे सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. जायकवाडी धरणाचा कालवा पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यासाठी मोहीम हाती घेण्याची मागणी आ. सोळंके यांनी केली. * पीक कर्ज आणि बँकिंग: पीक कर्ज देताना 'सिबिल' (CIBIL) रिपोर्टमुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींची दखल घेत, बँकांनी सिबिलच्या आधारावर कर्ज नाकारू नये, अशी ताकीद देण्यात आली. बैठकीच्या शेवटी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उद्याच्या 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिना'च्या (१७ सप्टेंबर) पार्श्वभूमीवर सर्व उपस्थित लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या. प्रशासनाने सर्व लोकप्रतिनिधींच्या सूचनांची गंभीर दखल घेऊन टंचाई निवारणासाठी युद्धपातळीवर कामाला लागावे, असे आदेश त्यांनी दिले.


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903



Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६


## बीड-पुणे रेल्वेला सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी; नाट्यगृह नूतनीकरण व तारांगण प्रकल्पाचे भूमिपूजन

**बीड (भगवंत पाळवदे) :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत बीडकरांसाठी आजचा दिवस अत्यंत ऐतिहासिक व आनंददायी ठरला आहे. अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेल्या 'बीड-पुणे' थेट रेल्वेसेवेचा आज राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शानदार शुभारंभ करण्यात आला. याच भरगच्च कार्यक्रमात बीडच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाला मोठी चालना देणाऱ्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे आणि धानोरा रस्त्यावरील 'पंढरी' येथील विज्ञान उद्यान व तारांगण प्रकल्पाचे भूमिपूजनही मोठ्या उत्साहात पार पडले. या महत्त्वपूर्ण सोहळ्यासाठी खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार विजयसिंह पंडित या लोकप्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रशासकीय पातळीवर उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे प्रामुख्याने उपस्थित होते. बीड जिल्हा अनेक दशके रेल्वे नकाशापासून दूर असल्याने शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि नोकरदार वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून आज सुरू झालेल्या या थेट रेल्वेसेवेमुळे बीडकरांची अनेक वर्षांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे.याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्या स्वप्नांना उजाळा दिला. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करताना त्यांनी रेल्वे जोडणीला नेहमीच प्राधान्य दिले होते. गेल्या वर्षी १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड-अहिल्यानगर रेल्वेसेवा सुरू करताना, पुढील वर्षी बीडकरांना थेट पुण्यापर्यंत प्रवास करता येईल, असा शब्द देण्यात आला होता. आज तोच शब्द पूर्ण करताना मराठवाड्याची कन्या म्हणून मला विशेष अभिमान वाटत आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. तसेच, येत्या काही महिन्यांत बीड ते पनवेल ही थेट रेल्वेसेवा सुरू करण्याचा मानस व्यक्त करत, बीड-परळी मार्ग पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग थेट दक्षिण भारताशी जोडला जाईल आणि त्यामुळे मराठवाड्याच्या विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. रेल्वेच्या शुभारंभासोबतच बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ आज रोवली गेली. बीडच्या स्थानिक कलाकारांसाठी अनेक दशकांपासून हक्काचे व्यासपीठ असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी ८ कोटी १९ लाख रुपयांचा निधी प्रशासकीय पातळीवर मंजूर करण्यात आला असून, जुन्या भिंती कायम ठेवत येथे अत्याधुनिक ध्वनी व प्रकाश व्यवस्था, साउंड इकोस्टिक, सेंट्रल एसी, आरामदायी आसनव्यवस्था आणि आधुनिक ग्रीन रूम्स उभारण्यात येणार आहेत. यासोबतच, धानोरा रस्त्यावरील "पंढरी" येथे सुमारे २८ कोटी रुपये खर्चाचे भव्य तारांगण व विज्ञान उद्यान उभारले जाणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत १४ कोटी रुपयांना मंजुरी मिळाली असून, या ठिकाणी विद्यार्थ्यांना मातृभाषेतून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आभासी तंत्रज्ञान आणि खगोलशास्त्राची सविस्तर माहिती उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाच्या समारोपात पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी १७ सप्टेंबर या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हैदराबाद मुक्ती संग्रामात हौतात्म्य पत्करलेल्या व तुरुंगवास भोगलेल्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र आदरांजली वाहिली. तसेच, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस असल्याने त्यांनाही मंचावरून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि येथील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही देत, मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देऊन या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली. यावेळी रेल संख्या "झिरो वन फोर झिरो वन" प्रस्थान के लिए तयार है हा आवाज परिसरात घुमला. शिट्टीचा तीव्र स्वर घुमला, इंजिनाने दमदार गर्जना केली आणि पाहता पाहता, झिरो वन फोर झिरो वनने आपल्या पुढच्या प्रवासासाठी वेग घेतला. यावेळी भारतीय रेल्वेचा महाराष्ट्र राज्याच्या विकासात योगदान या विषयावर निबंध आणि चित्रकला स्पर्धेमधील उत्तीर्ण शाळकरी विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले तर विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा, तसेच खासदार बजरंग सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले

## आसेगावच्या ग्लोबल स्कूलमध्ये मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा




**दौलताबाद (जावेद अहमद) :** आसेगाव येथील प्रतिष्ठित नागरिक देविदास अण्णा फाळके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या संचालिका गीता फाळके होत्या. सचिव रत्नाकर फाळके , अध्यक्ष बाबासाहेब सोनटक्के, प्राचार्य योगेश फाळके, मुख्याध्यापिका रोशनी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आहेर सर, सहाय्यक अभियंता (विद्युत), माळीवाडा, मिसाळ मॅडम (विद्युत सहाय्यक), बागुल मॅडम उपस्थित होते.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या इतिहासावर आधारित भाषणे तसेच विविध सांस्कृतिक नृत्यांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून स्वातंत्र्यसंग्रामातील शूरवीरांच्या योगदानाला अभिवादन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक नागेश लिंगायत, सत्यजित पवार, आदित्य घुगे, परमेश्वर उबाळे, अजिनाथ पल्हाळ, अबरार पठाण तसेच शिक्षिका अनिसा शेख, नम्रता थोरात, आसमा पठाण, शोभा नागरे, अर्चना थळपती, सविता राजगुरू, सुनीता बहुरे, पूजा कावडे, वर्षा काळवण, जयश्री मस्के, सोनम भागुंडे, सुनीता त्रिभुवन, सुनीता सूर्यवंशी, ज्ञानेश्वरी देवचे, अश्विनी जाधव, रोहिणी पल्हाळ, अनुराधा यादव, सुषमा गोल्हार, वैष्णवी बनकर तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा शिक्षकांनी पुढे नेणे गरजेचे



**कन्नड :** त्रैमासिक तिफण व तिफण वाचक चळवळ यांच्या वतीने महात्मा जोतिराव फुले द्विजन्मशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान समारंभ शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे उत्साहात संपन्न झाला. ( ता. १८ )कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. प्रमुख अतिथी म्हणून तिफण वाचक चळवळीचे मार्गदर्शक ॲड. कृष्णा जाधव व नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे उपस्थित होते.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले, "विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण करणाराच खरा आदर्श शिक्षक असतो. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आजच्या शिक्षकांनी पुढे नेणे गरजेचे आहे."ॲड. कृष्णा जाधव म्हणाले, "शिक्षक हा केवळ नोकरी करणारा नसून समाज घडवणारा शिल्पकार आहे. फुले यांनी शिक्षणातून समतेचा मार्ग दाखवला."नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे म्हणाले, "मूल्याधिष्ठित शिक्षण ही काळाची गरज आहे. शिक्षक हे समाजाचे भूषण असतात. राष्ट्र उभारणीत त्यांचे मोठे योगदान आहे."यावेळी डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. संजय भालेराव, दिपाली घुगे, डॉ. उदय डोंगरे, डॉ. प्रकाश खेत्री, अनिता राठोड, डॉ. रामचंद्र झाडे, प्रा. रामनाथ टेकाळे, किशोर घुगे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. आर. एम. घोती आणि प्रवीण दाभाडे या १२ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंगेश जाधव यांनी केले, तर आभार डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले. संयोजन व प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६


## बीड मध्य रेल्वेकडून पुणे आणि बीड दरम्यान नवीन दैनंदिन एक्सप्रेस रेल्वे सेवा सुरू

**बीड - भगवंत पाळवदे** प्रवाशांच्या दीर्घकाळापासून असलेल्या मागणीची पूर्तता करण्यासाठी तसेच या भागातील रेल्वे कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने, रेल्वे बोर्डाने पुणे आणि बीड दरम्यान नवीन नियमित दैनंदिन एक्सप्रेस रेल्वे सेवा सुरू करण्यास मंजुरी दिली आहे.नवीन सुरू करण्यात येणाऱ्या रेल्वे सेवेचा तपशील आणि वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे:गाडी क्रमांक 11433 / 11434 पुणे – बीड – पुणे एक्सप्रेस (दैनंदिन)गाडी क्रमांक 11433 पुणे – बीड एक्सप्रेस (दैनंदिन) ची नियमित सेवा 22.09.2026 (मंगळवार) पासून सुरू होईल. ही गाडी दररोज पुणे येथून 22:45 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 06:00 वाजता बीड येथे पोहोचेल.गाडी क्रमांक 11434 बीड – पुणे एक्सप्रेस (दैनंदिन) ची नियमित सेवा 23.09.2026 (बुधवार) पासून सुरू होईल. ही गाडी दररोज बीड येथून 21:30 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 05:20 वाजता पुणे येथे पोहोचेल.अंतर आणि प्रवासाचा कालावधी: ही गाडी एकूण 326 किलोमीटरचे अंतर कापेल. पुणे ते बीड प्रवासाचा कालावधी 07 तास 15 मिनिटे, तर बीड ते पुणे परतीच्या प्रवासाचा कालावधी 07 तास 50 मिनिटे असेल.डब्यांची संरचना: ही गाडी आधुनिक 15 एलएचबी डब्यांच्या संरचनेसह चालविण्यात येईल. यामध्ये 01 एसी 2-टियर (LWACCW), 02 एसी 3-टियर (LWACCN), 06 स्लीपर क्लास (LWSCN), 04 जनरल सेकंड क्लास (LWS), 01 सेकंड क्लास लगेज/ब्रेक व्हॅन (LSLRD) आणि 01 जनरेटर कार (LWLRRM) यांचा समावेश आहे.थांबे: उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, श्रीगोंदा रोड, अहिल्यानगर, नारायणडोह, न्यू आष्टी आणि अमळनेर भंड्याचे.आरक्षण आणि तिकीट बुकिंगची माहितीनव्याने सुरू करण्यात येणाऱ्या नियमित गाडी क्रमांक 11433 आणि 11434 चे आरक्षण 20.09.2026 पासून सर्व संगणकीकृत पीआरएस तिकीट केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीच्या वेबसाइटवर (www.irctc.co.in) सुरू होईल.इतर गाड्यांच्या वेळेत बदलनवीन दैनंदिन सेवा सुरू करण्यात आल्याने परिचालनाच्या दृष्टीने खालील बदल करण्यात आले आहेत. प्रवाशांनी याची कृपया नोंद घ्यावी:गाडी क्रमांक 11405 पुणे – अमरावती एक्सप्रेस: 25.09.2026 पासून ही गाडी पुणे येथून 22:55 वाजता सुटेल. यापूर्वी तिची पुणे येथून सुटण्याची वेळ 22:45 वाजता होती. दौंड येथे ही गाडी 00:28/00:30 वाजता थांबेल. यापूर्वी दौंड येथील थांब्याची वेळ 00:10/00:12 वाजता होती. इतर स्थानकांच्या विद्यमान वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.गाडी क्रमांक 11417 पुणे – सोलापूर एक्सप्रेस: 22.09.2026 पासून ही गाडी पुणे येथून 23:05 वाजता सुटेल. यापूर्वी तिची पुणे येथून सुटण्याची वेळ 23:00 वाजता होती. दौंड येथे ही गाडी 01:25/01:30 वाजता थांबेल. यापूर्वी दौंड येथील थांब्याची वेळ 00:55/01:00 वाजता होती. इतर स्थानकांच्या विद्यमान वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.गाडी क्रमांक 16381 पुणे – कन्याकुमारी एक्सप्रेस: 22.09.2026 पासून ही गाडी सुधारित वेळापत्रकानुसार धावेल. ही गाडी पुणे येथून पूर्वीच्या 23:45 वाजताच्या वेळेऐवजी सुधारित वेळेनुसार 23:20 वाजता सुटेल. ही गाडी दौंड येथे 00:20/00:25 वाजता, कुर्डुवाडी येथे 02:03/02:05 वाजता आणि सोलापूर येथे 03:20/03:25 वाजता थांबेल.प्रवाशांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी मार्गावरील सर्व स्थानकांवरील गाडीच्या अचूक आगमन व प्रस्थानाच्या वेळांची माहिती भारतीय रेल्वेच्या चौकशी पोर्टल www.enquiry.indianrail.gov.in वर किंवा अधिकृत NTES ॲप डाउनलोड करून तपासून घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.दिनांक: 17.09.2026पीआर क्रमांक: 2026/09/08

## जिल्हा परिषदेच्या शाळा टिकली पाहिजेखाजगी शाळेचे शिक्षण हे सामान्य माणसाला परवडणारे नाही इंदुरीकर महाराज



**दौलताबाद (जावेद अहमद) :** छावणी गणेश महासंघातर्फे प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या विशेष कीर्तन सोहळ्याचे शानदार आयोजन करण्यात आले होते. मोबाईलचे व्यसन आणि शिक्षण पद्धती: इंदुरीकर महाराजांनी आजच्या युवा पिढीला जडलेले मोबाईलचे व्यसन, त्यामुळे बिघडणारी शिक्षण पद्धती आणि वाढती बेरोजगारी या ज्वलंत विषयांवर आपल्या खास विनोदी अन् अभ्यासपूर्ण शैलीत अभंगाच्या माध्यमातून घणाघाती भाष्य केले.आई-वडिलांचे छत्र व मान-सन्मान: तरुण पिढीने आपल्या आई-वडिलांचा सांभाळ कसा करावा, त्यांना वृद्धापकाळात कसा आधार द्यावा, यावर महाराजांनी विशेष भर देत उपस्थितांचे डोळे उघडले.व्यसनाधीनता व वाईट संगतीवर भाष्य: तरुणांमध्ये वेगाने वाढणारी व्यसनाधीनता आणि चुकीच्या संगतीमुळे होणारे नुकसान यावर आपल्या विशिष्ट शैलीत भाष्य करत महाराजांनी युवकांचे कान टोचले.या भक्तीमय व प्रबोधनात्मक प्रसंगी छावणी गणेश महासंघाचे अध्यक्ष महादेव जाधव, छावणी गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष अशोक सायना यादव, कार्याध्यक्ष रखमाजी जाधव, उपमहापौर राजेंद्र जंजाळ प्रशांत तारगे, करण सिंग काकस,पप्पू वर्मा,संतोष आम्ले, राहुल एलदी,नंदू म्हस्के,छावणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक डॉ. विवेक जाधव, अनिल जयस्वाल, संजय गारोल, शेखर भंडारी, निलेश गजरा, राम गजरा, निलेश धारकर, सुरासे मामा यांच्यासह छावणीतील सर्व पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने गणेशभक्त उपस्थित होते.

## कन्नड तालुक्यातील शिक्षकांचा 'व्हॉट्सॲप लेफ्ट' मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**कन्नड (अरुण थोरात) :** शिक्षकांवरील वाढता अशैक्षणिक कामांचा ताण, विविध ऑनलाइन माहिती भरण्याची सक्ती, वारंवार मागविण्यात येणारी माहिती तसेच शाळेच्या प्रत्यक्ष अध्यापनावर होणारा परिणाम तसेच गंगापूर खुलताबाद तालुक्यातील शिक्षकांवरील कारवाई निषेधार्थ कन्नड तालुक्यातील शिक्षकांनी सुरू केलेल्या व्हॉट्सॲप लेफ्ट मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आता आम्हला शिकवू द्या आणि मराठी शाळा टिकवू या. अशी राज्यव्यापी चळवळ सुरु करत असल्याचे शिक्षक समन्वय समितीचे नेते दिपक पवार यांनी सांगितले दि.१८ सप्टेंबर रोजी शिक्षक समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने शिक्षक सेनेचे राज्य समन्वयक दिपक पवार तसेच शिक्षक भारतीचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद पवार यांच्यासह शिक्षकांच्या सर्व संघटनाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत गटशिक्षणधिकारी कार्यालयास निवेदन देण्यात आले. यावेळी तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कन्नड तालुक्यातील समन्वय समिती व विविध शिक्षक संघटनांच्या वतीने गटशिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा, अनावश्यक ऑनलाइन व अशैक्षणिक कामांचा ताण कमी करावा आणि प्रशासकीय माहितीची देवाणघेवाण अधिकृत माध्यमातून करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर अनेक शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आमचे सर्वोच्च कर्तव्य विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे आहे. त्यामुळे शिक्षकांचे लक्ष केवळ अध्यापन आणि विद्यार्थीहिताकडे केंद्रित राहावे,अशी भूमिका शिक्षकांनी मांडली आहे. दरम्यान तालुक्यातील शिक्षकांनी या मोहिमेत सहभागी होत अनावश्यक व्हॉट्सॲप गटांमधून सामूहिकरीत्या बाहेर पडण्यास सुरुवात केली असून, प्रशासकीय माहिती अधिकृत पत्रव्यवहारातूनच द्यावी, अशी मागणीही करण्यात येत आहे. त्यामुळे या मोहिमेकडे शिक्षण विभागाचे लक्ष वेधले गेले आहे. यावेळी सचिन आहेर, कल्याण पवार, सतीश कोळी, दिनेश निकम, दिलीप मगर, अमृत सोमवंशी, किशोर नागणे, शब्बीर शेख, के. जी.घुगे, योगेश मुळे, एच डी.चित्ते, किशोर बिडवे, ढोले डी. बी. यासह तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI
MJ NEWS

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६


## डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेनमध्ये राष्ट्रीय फार्माकोव्हिजिलन्स सप्ताहांतर्गत जनजागृती कार्यक्रम





**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन, छत्रपती संभाजीनगर येथील प्राणिशास्त्र विभागातर्फे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील औषधशास्त्र विभागाच्या सहकार्याने 'नॅशनल फार्माकोव्हिजिलन्स वीक २०२६' अंतर्गत "पीव्हीपीआय, औषधांची सुरक्षितता आणि एडीआर रिपोर्टिंग याविषयी जनजागृती व संवेदनशीलता कार्यक्रम" आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम १८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न झाला.कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थिनी तसेच उपस्थित सहभागी यांच्यामध्ये औषधांची सुरक्षितता, औषधांचा तर्कसंगत वापर आणि प्रतिकूल औषध प्रतिक्रिया (Adverse Drug Reactions – ADR) याबाबत जनजागृती व संवेदनशीलता निर्माण करणे हा होता. कार्यक्रमाची संकल्पना "फार्माकोव्हिजिलन्सच्या माध्यमातून औषधांच्या तर्कसंगत वापराला प्रोत्साहन : सुरक्षित आरोग्यसेवेच्या दिशेने एक पाऊल" अशी होती.या कार्यक्रमास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील औषधशास्त्र विभागाचे विभागप्रमुख तथा शैक्षणिक कार्याचे उपअधिष्ठाता डॉ. एम. एस. बेग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी फार्माकोव्हिजिलन्स आणि औषधांच्या सुरक्षिततेशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन केले.डॉ. भक्ती चांडेकर आणि डॉ. अमरीन यांनी सुरक्षित आरोग्यसेवा तसेच औषधांमुळे होणाऱ्या प्रतिकूल प्रतिक्रियांची नोंद व अहवाल सादर करण्याच्या महत्त्वाबाबत सविस्तर माहिती दिली. नोडल अधिकारी डॉ. भगत तसेच वरिष्ठ आणि कनिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही या जनजागृती कार्यक्रमात विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. विद्या प्रधान होत्या. यावेळी ज्युनिअर कॉलेजच्या उपप्राचार्या श्रीमती नाजेमा खान तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.या जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना औषधांचा सुरक्षित आणि तर्कसंगत वापर करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच प्रतिकूल औषध प्रतिक्रियांची (ADR) ओळख करून त्याबाबत योग्य पद्धतीने अहवाल सादर करण्याविषयी जागरूक करण्यात आले. सुरक्षित आरोग्यसेवा आणि जबाबदार औषधवापराच्या दिशेने हा कार्यक्रम एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रम ठरला.कार्यकर्मा चा सूत्र संचालन महाविद्यालयची विद्यार्थिनी सय्यदा कुलसुम ने केला.

## पिशोर येथे वीज पडून मृत्यू झालेल्या कुटुंबीयांस इम्तियाज जलील यांची भेट



**कन्नड (अरुण थोरात) :** पिशोर ता. कन्नड येथे दि 17 सप्टेंबर रोजी वीज पडून तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दु:खद घटनेनंतर एमआयएम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार हाजी सय्यद इम्तियाज जलील यांनी मयतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी इम्तियाज जलील साहेब यांनी तिन्ही कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या दु:खात सहभागी असल्याचे सांगितले. तसेच मयतांच्या कुटुंबीयांना भविष्यात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास पक्ष त्यांच्या मदतीसाठी सदैव तयार राहील, असे आश्वासन दिले.या प्रसंगी एमआयएम महाराष्ट्र प्रदेश महासचिव तथा मनपा विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर, औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शारेख नक्षबंदी, जिल्हा कार्याध्यक्ष जावेद खान पटेल, जिल्हा महासचिवह शेख कलीम, जिल्हा महासचिव विकास एडके, जिल्हा उपाध्यक्ष नइम शेख, मेहराज खान, राजू पटेल, जिल्हा सचिव पवन गायकवाड, नगरसेवक काकासाहेब काकडे, नगरसेवक अमर बिन हैदरा, नगरसेवक वाजेद जहागिरदार, नगरसेवक सलमान कुरेशी, नगरसेवक अमजद खान चाचू, कन्नड़ तालुका अध्यक्ष नासेर पटेल, कन्नड शहराध्यक्ष रईस पवार, हाजी एम डी पठाण, सय्यद अहमद, अशफ़ाक भाई बोरसर, कमर शहा, आबेद पिंजारी नाचणवेल, मोहम्मद भाई यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दु:खद प्रसंगी उपस्थितांनी मयतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करून त्यांना धीर दिला.

## "टेलर"कष्टकऱ्यांच्या वेदनांचा शब्दरूप देणारा कवितासंग्रह




मराठवाड्याच्या तिफण परिवाराचा युवा कवी बहुरंगीकार लक्ष्मण ग. वाल्डे यांचा 'टेलर' हा कवितासंग्रह मराठी साहित्यात कष्टकऱ्यांच्या कष्टाला वाचा फोडणारा वेगळ्या धाटणीचा संग्रह असून हा संग्रह केवळ एका टेलर व्यवसायाचे वर्णन करत नाही, तर टेलरच्या हातातील सुई, दोरा, कात्री, मशीन, इस्त्री, मापपट्टी, बटण, कॉलर यांसारख्या वस्तूंना मानवी भावविश्वाशी जोडतो आहे. या कवितासंग्रहाचा मुख्य आशय म्हणजे श्रमाचे सौंदर्य, दारिद्र्याचा संघर्ष, आई-वडिलांचे कष्ट, बदलत्या काळात नामशेष होत चाललेला पारंपरिक टेलर व्यवसाय आणि त्यामागील माणुसकी. कवी स्वतः टेलर कुटुंबात वाढलेला असून कवीचे वडील टेलर काम करतात व स्वतः कवीने आयुष्याच्या सुरुवातीला टेलर काम केले आहे.त्यामुळे या संग्रहातील सर्व कविता वास्तव अनुभवाचा लेखाजोखा आहे. अर्पणपत्रिकेतही त्यांनी संपूर्ण आयुष्य टेलरकामात घालवणाऱ्या कारागिरांना हा संग्रह अर्पण केला आहे, यावरून त्यांची सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते. 'टेलर', 'शिलाई मशीन', 'जुना-नवा टेलर', 'माप', 'कटाई', 'रेडीमेड कपडे' अशा कवितांतून बदलत्या काळाचा वेध घेताना कवी अत्यंत प्रभावी प्रतीकांचा वापर करतात. "माप" हे केवळ कपड्याचे नसून आयुष्याचे आहे, "कटाई" ही केवळ कापडाची नसून नियतीची आहे आणि "शिलाई" ही फक्त कपड्यांची नसून तुटलेल्या संसाराला जोडण्याची प्रक्रिया आहे. अशा प्रतीकात्मकतेमुळे कविता अधिक अर्थगर्भ बनते. भाषेच्या दृष्टीने संग्रहाचे मोठे वैशिष्ट्य म्हणजे मराठवाड्याच्या उत्तरेला गौताळ्याच्या वनात वसलेल्या कन्नड तालुक्यातील सहज, सरळ, बोलीभाषेचा वापर करताना कृत्रिम अलंकार किंवा अवघड शब्दांचा वापर न करता कवी सामान्य माणसाच्या भाषेत असामान्य अनुभव व्यक्त करतात. त्यामुळे कविता वाचकांच्या मनात सहज भिडते.संग्रहातील प्रतिमासृष्टी अत्यंत जिवंत आहे. सुई, दोरा, मशीन, इस्त्री, कात्री, हँगर, बटण, धागा यांसारख्या निर्जीव वस्तू कवीच्या शब्दांमुळे जणू सजीव होतात. या वस्तूंच्या माध्यमातून बापाचे कष्ट, आईचा त्याग, मुलांची स्वप्ने आणि काळाची बदलती दिशा उभी राहते.सामाजिक जाणिवेच्या दृष्टीने हा संग्रह विशेष महत्त्वाचा आहे. रेडीमेड कपड्यांच्या वाढत्या बाजारपेठेमुळे पारंपरिक टेलर व्यवसाय कसा मागे पडत आहे, कारागिरांची उपेक्षा कशी होत आहे आणि श्रमाचे मूल्य कसे कमी होत चालले आहे, याची प्रभावी नोंद या कवितांत आहे. 'टेलर' हा केवळ कविता संग्रह नाही तर श्रम, स्वाभिमान, संघर्ष आणि माणुसकीचा दस्तऐवज आहे. टेलर व्यवसायाच्या माध्यमातून कवी लक्ष्मण वाल्डे यांनी एका कष्टकरी समाजाचे दु:ख, वेदना, होरपळ,स्वप्ने आणि जीवनदर्शन शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी कवितेत वेगळा विषय, प्रामाणिक अनुभव आणि सामाजिक भान यांमुळे हा संग्रह निश्चितच उल्लेखनीय ठरतो अन् विशेष म्हणजे टेलर व्यावसायिकांचा जीवनावर आधारित "उसवण" या प्रसिद्ध कादंबरीचे लेखक,साहित्य अकादमी प्राप्त युवा साहित्यिक, कविवर्य देविदास सौदागर यांनी या संग्रहाची पाठराखण व प्रसिद्ध समीक्षक डॉ.पी.विठ्ठल सरांनी शुभेच्छा दिल्या आहेत व व्यवसायाने टेलर असलेले वैजापूर तालुक्यातील जेष्ठ कवी श्री. निवृत्ती काळे सर यांनी अनमोल प्रस्तावना देऊन खऱ्या अर्थाने संबंध टेलर व्यावसायिकांचा सन्मान केला आहे.टेलर व्यवसायातील श्रम, संघर्ष, वेदना, स्वाभिमान आणि माणुसकी यांना शब्दरूप देणारा हा कन्नडच्या मातीतील कवितासंग्रह मराठी साहित्यात वेगळी ओळख निर्माण करो. कवी लक्ष्मण दादा यांच्या लेखणीतून उपेक्षित श्रमिकांचे वास्तव जीवन अधिकाधिक प्रभावीपणे जगासमोर येवो. मराठी साहित्यातील या आगळ्या वेगळ्या संग्रहाच्या प्रकाशनाबद्दल कवीचे हार्दिक अभिनंदन व पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मन:पूर्वक खारीच्या वावरभर शुभेच्छा!

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६

# नलावडे सर



माणसाच्या आयुष्यात अनेक माणसे येतात आणि जातात, पण काही माणसे अशी असतात की ती आयुष्याची दिशाच बदलून टाकतात. अंधारातून प्रकाशाकडे नेणारा हात म्हणजे गुरु. माझ्या आयुष्यात तो हात आहे माझे गुरु मुख्याध्यापक वसंतराव नलावडे सरांचा. त्यांच्याबद्दल लिहिणे म्हणजे केवळ एका व्यक्तीबद्दल लिहिणे नाही, तर एका विचाराबद्दल, एका तपस्येबद्दल, एका युगाबद्दल लिहिणे आहे.माझे गाव देशगव्हाण हे जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यातील एक छोटेसे खेडे गाव आहे. मातीशी नाळ जुळलेले, दुष्काळाशी झुंजणारे आणि शिक्षणासाठी धडपडणारे माझ्या गावातील लोक. अशा गावात जन्माला आलेल्या माझ्यासारख्या पोरासाठी शिक्षण ही सहज गोष्ट नव्हती. अशा वेळी आमच्यासाठी आधार होता तो जवळच असलेल्या बदनापूर तालुक्यातील वाकुळणी गावचा. वाकुळणीच्या छत्रपती संभाजी विद्यालयात नलावडे सर मुख्याध्यापक होते. तसे पाहिले तर वाकुळणी हे नकाशावर छोटेसे गाव, पण नलावडे सरांमुळे त्या शाळेचे नाव पंचक्रोशीत आदराने घेतले जायचे. अंबड तालुक्यातील देशगव्हाण जरी प्रशासकीयदृष्ट्या वेगळ्या तालुक्यात असले तरी अंतराने जवळ असल्याने माझा आणि वाकुळणी शाळेचा संबंध अगदी जिव्हाळ्याचा होता.सरांना मी पहिल्यांदा पाहिले तेव्हा त्यांची मूर्ती आजही माझ्या डोळ्यासमोर जशीच्या तशी उभी राहते. उंच, धिप्पाड आणि सडसडीत बांधा, रुंद आणि तेजस्वी भरदार कपाळ जणू ज्ञानाचे भांडारच, डोळ्यावर साधा चष्मा आणि डोळ्यात विद्यार्थ्यांच्या भविष्याची सततची काळजी. त्यांचा पेहराव नेहमी टापटीप असायचा, स्वच्छ पँट आणि कडक इस्त्रीचा शर्ट. कधीही भडकपणा नाही, कधीही दिखावा नाही. ते शाळेच्या पटांगणावरून चालत आले की मुले आपोआप शिस्तीत उभी राहायची, दंगा करणारी पोरंही एका कटाक्षात शांत व्हायची. त्यांना कधी मोठ्या आवाजात ओरडावे लागले नाही, त्यांचे असणेच पुरेसे होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात एक वेगळाच दरारा होता आणि त्या दराऱ्यामागे मायेचा ओलावा होता.सर अतिशय हुशार, शिस्तप्रिय आणि मेहनती होते. त्यांच्यासाठी मुख्याध्यापकपद ही खुर्ची नव्हती, ती एक जबाबदारी होती, एक व्रत होते. त्यांनी शाळेत आल्यावर पहिले काम केले ते शाळेला शिस्त लावण्याचे. शाळा सकाळी बरोबर वेळेवर भरणे, प्रार्थना एका सुरात होणे, प्रत्येक शिक्षकाने वेळेवर वर्गावर जाणे, विद्यार्थ्यांने गणवेशात येणे, वर्ग स्वच्छ असणे या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींतून त्यांनी मोठी शिस्त उभी केली. पण त्यांची शिस्त ही कधीच दंडुक्याची नव्हती, ती प्रेमाची होती.ग्रामीण भागातील मुलांची परिस्थिती त्यांना चांगली माहीत होती. अनेकांच्या घरी संध्याकाळी अभ्यासाला वीज नसायची, बसायला जागा नसायची, आई-वडील शेतातून थकून आलेले असायचे. अशा मुलांसाठी सरांनी एक धाडसी निर्णय घेतला. त्यांनी शाळेत रात्रीची अभ्यासिका सुरू केली. संध्याकाळी सात ते दहा शाळेच्या दोन खोल्या उघड्या असायच्या, तिथे ट्यूबलाईटच्या प्रकाशात आम्ही अभ्यासाला बसायचो. सर स्वतः रात्री नऊ वाजता येऊन कोण अभ्यास करतोय, कोणाला काय अडचण आहे हे पाहायचे. अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांसाठी त्यांनी सकाळी लवकर आणि संध्याकाळी उशिरा मोफत एक्स्ट्रा क्लासेस सुरू केले. त्यासाठी त्यांनी कधीही एक रुपया घेतला नाही. आजच्या काळात जिथे शिकवणीचे पेव फुटले आहे, तिथे त्या काळी सरांनी ज्ञानदानाचे व्रत असेच निस्वार्थपणे जपले. त्यांचे एकच स्वप्न होते, माझी पोरं शिकली पाहिजेत, मोठी झाली पाहिजेत. आणि त्यांच्या या स्वप्नामुळेच वाकुळणीसारख्या छोट्या गावातली मुले आज मोठमोठ्या शहरात नोकऱ्यांवर आहेत.सरांचे शिकवणे हा तर एक वेगळाच सोहळा असायचा. कोणताही विषय असो तो ते इतक्या सोप्या भाषेत सांगायचे की अवघडातला अवघड विषयही सोपा वाटायचा. इतिहास शिकवताना छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम ते असा सांगायचे की जणू महाराज घोड्यावर बसून वर्गातच आले आहेत असे वाटायचे. भूगोल शिकवताना नकाशा ते मनावर कोरायचे. ते फळ्यावर कमी आणि मनावर जास्त लिहायचे. त्यांच्या तासाला कधीही कंटाळा येत नसे.सरांचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते उत्तम वक्ते होते. परिसरात त्यांची भाषणे व्हायची. जत्रा असो, शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन असो, की एखाद्या महापुरुषाची जयंती असो, नलावडे सरांचे भाषण ठरलेले असायचे. ते बोलायला उभे राहिले की लोक शांत होऊन ऐकायचे. त्यांच्या वाणीमध्ये ओज होते, विचार होता आणि संस्कार होता. शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ते इतक्या ओघवत्या शैलीत मांडायचे की ऐकणारा मंत्रमुग्ध व्हायचा. त्यांच्या वक्तृत्वामुळेच परिसरातील अनेक तरुणांना वैचारिक दिशा मिळाली.सरांना वाचनाचे विलक्षण वेड होते. त्यांचे कार्यालय म्हणजे एक छोटेसे ग्रंथालयच होते. कपाटात पुस्तकांची दाटी असायची आणि भिंतीवर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकाराम महाराज यांचे फोटो असायचे. ते नेहमी म्हणायचे, माणसाने मोठ्या माणसांच्या सहवासात राहिले पाहिजे आणि तो सहवास पुस्तकातून मिळतो. माझ्यावर त्यांचा विशेष लोभ होता. मी अभ्यासात हुशार आहे हे पाहून त्यांनी मला जवळ केले. "शिवाजी, हे शिवचरित्र वाच, कसा राजा घडतो ते कळेल. हे डॉ. आंबेडकरांचे पुस्तक वाच, शिक्षण म्हणजे काय ते कळेल. फुल्यांचे विचार समजून घे, तुकोबाचा अभंग पाठ कर," असे म्हणून ते माझ्या हातात पुस्तके ठेवायचे. त्या वयात मला त्या पुस्तकांचे महत्त्व कळत नव्हते, पण मी ती पुस्तके वाचत गेलो आणि माझ्या मनात एक वेगळेच जग तयार होत गेले. त्यांनी मला स्वप्न पाहायला शिकवले. देशगव्हाण सारख्या छोट्या खेड्यातल्या पोराने मोठी स्वप्ने पाहावीत, हे धाडस त्यांनीच मला दिले.सरांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांची अध्यात्मिक आणि सांस्कृतिक बैठक. परिसरातील थोर वारकरी संत गुरुवर्य ह.भ.प. भानुदास महाराज अटाळकर यांच्याशी त्यांचे विशेष आत्मीय संबंध होते. एकीकडे आधुनिक शिक्षणाचा आग्रह धरणारे, विज्ञानवादी विचार रुजवणारे मुख्याध्यापक आणि दुसरीकडे वारकरी संप्रदायातील थोर संतांशी आत्मीयता जपणारे साधक, असे दोन्ही रूप त्यांच्यात होते. ते महाराजांच्या कीर्तनाला आवर्जून जायचे, त्यांच्याशी चर्चा करायचे, त्यांचे विचार ऐकायचे. त्यामुळेच त्यांच्या विचारात एक वेगळीच सात्विकता आणि संतांच्या विचारांची बैठक होती. ज्ञान आणि भक्तीचा हा संगम त्यांनी आपल्या आयुष्यात जपला होता.विद्यार्थ्यांविषयी त्यांना प्रचंड आपुलकी होती. ते आम्हाला विद्यार्थी म्हणून नाही तर आपल्या पोरासारखे जपायचे. या आपुलकीचे प्रसंग माझ्या आयुष्यावर कोरले गेले आहेत. माझे लग्न कन्नड तालुक्यातील मेहेगाव येथे होते. वाकुळणीपासून, देशगव्हाणपासून बरेच लांब. मी नवऱ्या मुलाच्या वेषात मंडपात उभा होतो आणि गर्दीतून अचानक सर येताना दिसले. उन्हातान्हातून एस.टी.चा प्रवास करून ते माझ्या लग्नाला आले होते. त्यांनी डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला तेव्हा माझे डोळे पाणावले. गुरु हा फक्त शाळेपुरता नसतो, तो आयुष्यभर सोबत असतो हे त्या दिवशी कळले.दुसरा प्रसंग तर माझ्या आयुष्यातला सगळ्यात मोठा सन्मान होता. मी जेव्हा एम.ए.ला होतो तेव्हा सरांनी मला बारावीच्या निरोप समारंभासाठी प्रमुख पाहुणा म्हणून बोलावले. ज्या शाळेत मी शिकलो, ज्या बाकावर बसलो, जिथे सरांनी मला घडवले, त्याच शाळेत प्रमुख पाहुणा म्हणून जाणे हे माझ्यासाठी स्वप्नच होते. त्या दिवशी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांसमोर माझा सत्कार केला आणि अभिमानाने सांगितले, "हा माझा विद्यार्थी आहे, हा देशगव्हाणच्या खेड्यातून आलेला पोरगा आज एम.ए. करतोय." त्या एका वाक्याने माझ्या शिक्षणाचे चीज झाले. गुरुने आपल्या शिष्याला दिलेली ही सगळ्यात मोठी पावती होती.माझ्या गावी देशगव्हाणला काही नैमित्तिक कारणाने जाणे झाले की सर आवर्जून माझी भेट घ्यायचे. एखाद्या कामानिमित्त अंबड तालुक्यात आले तरी चौकशी करून घरी यायचे, "काय चाललंय, काय वाचतोस, पुढे काय करणार?" अशी आस्थेने विचारपूस करायचे. एवढ्या मोठ्या माणसाने आमच्या छोट्याशा खेड्यात येऊन अशी भेट घेणे, हीच आमच्यासाठी मोठी गोष्ट होती.आणि माझ्या आयुष्यातला सगळ्यात सोनेरी क्षण म्हणजे मी जेव्हा मराठीचा प्राध्यापक झालो आणि साहित्य लिहायला लागलो तेव्हाचा. जेव्हा त्यांना कळले की त्यांचा विद्यार्थी प्राध्यापक झाला आहे, साहित्य लिहितो आहे, तेव्हा त्यांना झालेला आनंद मी शब्दात सांगू शकत नाही. त्यांच्या डोळ्यात एक वेगळेच समाधान होते, आपले रोपटे मोठे झाले, त्याला फळे आली याचे समाधान. माझ्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला ते आवर्जून उपस्थित होते. वय झालेले असतानाही ते माझ्या पुस्तक प्रकाशनाला आले, व्यासपीठावर बसले आणि त्यांनी माझे कौतुक केले. ते म्हणाले, "माझा विद्यार्थी आज माझ्यापेक्षा मोठा झाला आहे." गुरुच्या तोंडून हे वाक्य ऐकणे म्हणजे कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा पुरस्कार होता.आज मी जो काही आहे, प्राध्यापक म्हणून, साहित्यिक म्हणून, माणूस म्हणून, तो केवळ आणि केवळ नलावडे सरांमुळे आहे. अंबड तालुक्यातील देशगव्हाण सारख्या छोट्या खेड्यातून निघालेल्या पोराला त्यांनी पुस्तकांची वाट दाखवली, विचारांची वाट दाखवली, माणूस म्हणून जगण्याची वाट दाखवली. नलावडे सर हे माझ्यासाठी केवळ मुख्याध्यापक नाहीत, ते माझे गुरु आहेत,माझे मार्गदर्शक आहेत, माझे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या वाणीने, त्यांच्या शिस्तीने आणि संत सहवासाने घडलेले त्यांचे व्यक्तिमत्व हे आमच्यासारख्या पिढीसाठी दीपस्तंभ आहे. अशा या ज्ञानयोगी गुरूच्या ऋणातून मी या जन्मात कधीच मुक्त होऊ शकणार नाही. त्यांना माझा शतशः प्रणाम.

**डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ सप्टेंबर २०२६

# आम्ही भयंकाराच्या दरवाज्यात उभे आहोत

'शिक्षण' ही एक मूल्यप्रद संज्ञा आहे. मानवी विकासामध्ये शिक्षण हे क्रांतिबीज आहे. संबंध परिवर्तनाचे मौलिक साध्य आहे. उगीच का शैक्षणिक पुन:रार्थासाठी महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई यांनी एका विशिष्टांकडे असलेली शैक्षणिक मिरासदारी ह्या दांपत्याने मोडीत काढली. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. तेथून एका क्रांतिपर्वाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. तत्पूर्वी विद्येच्या किल्ल्या उच्चवर्गीयांच्या कमरेला बांधलेल्या होत्या त्यासाठी फुले दांपत्याचे कष्ट त्यांची त्यावेळी झालेली वाताहत, त्यांना करावा लागलेल्या संघर्षाची साक्ष आजही सनातनी वृत्तीच्या पुणे शहरात भिडेवाडा देतो आहे. त्या दांपत्यानी लिहिलेले साहित्य ऐतिहासिक ठरले आहे. म.फुल्यांना गुरूस्थानी मानणारे विश्वविख्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्येच्या उच्च शिखरावर पोहचले अनेकानेक मौलिक पदव्या मिळविल्या त्यांच सम्यक गमक, मध्यबिंदू काय असेल तर ते म्हणजे शिक्षण ! शिक्षणाने माणूस 'खऱ्या अर्थाने माणूस' होतो. संस्कारीत होतो, त्याला तिसरा डोळा येते तो विवेकशील बनतो हे खरचं आहे. यामध्ये काही दुमत असण्याचे कारण नाही, परंतु जनसामान्यांना विशेषत: स्त्रियांना ज्ञानदीप लावण्यासाठी ज्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. एका विशिष्ट वर्गाच्या कमरेच्या किल्ल्या ओढून नवा प्रकाशपथ दाखविला. त्या प्रकाशपथावर पुन्हा काजळी येते आहे. अंधाराचे भेसूर दार पुन्हा मिटते की काय अशी स्थिती गेल्या काही वर्षापासून निर्माण झाली आहे. संबंध विकास आणि उत्कर्षाचा मार्ग जर शिक्षण असेल तर त्याला बाधा आणली पाहिले हे प्रतिगामी शक्तीचं हत्यार आता ते धारदार करायला लागले आहेत. 'न्यू एज्युकेशन पॉलिशी' उच्च शिक्षणामध्ये जाणीवपूर्वक आणली आहे. नैतिक मूल्यांच्या वृद्धिसाठीचे शिक्षण त्यामुळे आपोआप वर्ज्य होणार आहे. जिल्हा परिषद, महानगरपालिकेच्या अनेक सरकारी शाळा महाराष्ट्रासह अनेक राज्यात बंद केल्याच्या बातम्या प्रसारित झाल्या आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात शाळांची वाढ होण्याची गरज होती. परंतु विसंगत चित्र दृष्टीस पडले आहे. जाणीवपूर्वक सरकार आपली जबाबदारी झिडकणार आहे. कारण शासन प्रशासनामध्ये मूलतत्ववादी तथा उजव्या विचारांच्या माणसांचा भरणा वाढला आहे. ह्या संकीर्ण प्रवृत्तीच्या लोकांनी शैक्षणिक मूल्यांवर प्रहार करणे सुरू केले आहे. शिक्षणाचे खाजगीकरण मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. म्हणजे शिक्षण बंद केले म्हणायला नको ? शाळा वाढल्या ना ? पण कुठल्या तर प्रायव्हेट केजी पासून हजारो, लाखो रूपये फीस भरून आम्ही म्हणे विद्यार्थ्यांना घडविणार आहोत. इकडे अनेकांच्या मूलभूत गरजा पूर्णत: मार्गी लागल्या नाहीत मग एवढा पैसा आणायचा कुठून ? परिणामी शिक्षण बंद, आणि शिक्षण बंद म्हणजे प्रकाशरोध अर्थात अंधार !अशी लाखो कुटुंब अंधाराच्या खाईमध्ये आपणाला दिसतील हे गेल्या एक-दीड दशकातले वर्तमान सजग माणसांच्या दृष्टीस पडेल. कुठे चाललो आहोत आम्ही ? उद्याच्या भारताच भविष्य आम्ही उजाड करीत आहोत. शिक्षणाच खाजगीकरण आम्ही थांबवत नाही, बाजारीकरणाला ब्रेक लावण्यात आम्ही अपयशी असू तर सर्वसाधारण कोट्यावधी मुलांच्या भविष्याच काय ? ही नैतिक जबाबदारी शासन, प्रशासनाची आहे. आपण ज्या स्टेजवर आहोत, जेथे आज विद्यमान आहोत त्याला कारण 'शिक्षण' आहे. शिक्षण नाही तर दृष्टी नाही आणि दृष्टी नाही तर ही सृष्टी हे जग कळेल कसे ? किती महत्त्वपूर्ण अर्थ आहे ह्या शिक्षणाचा ! आणि आम्ही ह्या शिक्षणासारख्या नवसंजिवनी देणाऱ्या मूल्यांचा बाजार मांडलाय ? हा कपाळकरंटेपणा नाही काय ? उत्पादित मालाचा (वस्तुचा) पुरवठा कमी जास्त होऊ शकतो त्याचे परिणाम मानवी जीवनावर मोठा आघात करू शकत नाहीत वेळ प्रसंगी अशा तुटी भरून काढता येऊ शकतात परंतु मूल्यांच्या ऱ्हसांच्या पून:र्भरणासाठी त्या मुलांच्या भवितव्यासाठी एकदा अपुरे पडलात तर कोवळे जीव कसे वाढणार ? अर्थात प्राथमिक शिक्षणाचा हा मुद्दा आहे त्याच नीट संगोपन केलं तरचं ती झाडं वाढणार आहेत ? काही वाढलेल्या झाडांना सुवास नसलेली फुलं लागली आहेत अशाचे करायचे काय ? माध्यमिक शिक्षणाची स्थिती अजून केविलवानी आहे जे मुलं-मुली शिकताहेत त्यांना नीटपणे शिकवायला शिक्षक उपलब्ध नाहीत काही माध्यमिक शाळा सोडल्या (अनुदानित) तर चित्र विदारक आहे. मिरासदारी गाजविणाऱ्या दादा लोकांच्या संस्था आहेत. त्यांना सरकारी अनुदान आहे ते त्यांच्या पद्धतीने चालवतात. कनिष्ठ आणि वरीष्ठ महाविद्यालयाची स्थिती तर मोठी अचंबित करणारी आहे. त्यावर कितीतरी स्वतंत्रपणे लिहिता येईल. गेंड्याची कातडी पांघरलेली ही व्यवस्थेतली (स्थिर) लोकं आहेत. महाराष्ट्राचे चित्र पाहू जाता स्वत: शासनाच्या मालकीची किती महाविद्यालये आहेत ? बोटावर मोजता येतील यापेक्षा अधिक नाही. बाकीची सर्व जुनी-नवी महाविद्यालये संस्थामालकांच्या घश्यात घातली आहेत. ही पुरोगामी महाराष्ट्र शासनाची सर्वात मोठी शैक्षणिक चूक आहे. अशी महाविद्यालये कुणाच्या आशीर्वादाने चालतात, चालवली जातात त्या अनेक संस्थेचे संचालक मंडळे कुणाची बटीक आहेत. त्यामागे काय राजकारण आहे हे शोधाचे विषय आहेत. सत्तेवरचे लोक, विरोधी पक्षातील लोक व अंशत: अपवादाने काही बिगर राजकीय लोकांच्या शैक्षणिक संस्था आहेत पण तेही शेवट संस्था मालकच ! महाविद्यालयाचा प्राचार्य कोण असावा त्याची शैक्षणिक पात्रता, अनुभव ह्या बाबी तर आहेतच परंतु ती मुख्यत: निवड माननीय कुलगुरूंची असावी अर्थात तत्वत: अप्रुव्हल त्यांचेच असते पण निर्धारित कोण करतं तर संचालक मंडळ बिनबुडाचं ! काय हा वेडगळपणा आहे. म्हणजे जो हुजरेगिरी करतो तो प्राचार्य होतो किंवा कुणाला करायचे हे ते ठरवतात. ते ठरवितात ते म्हणजे बिनबुडाचे ! शिक्षणाने माणूस सुसंस्कृत, स्वभिमानी अर्थात स्वावलंबी बनतो. समाजात त्याला प्रतिष्ठा प्राप्त होते हे बिनशर्त खरं आहे. परंतु गेल्या अडीच तीन दशकापासून निर्देशित केलेली स्थिती राहिली नाही. सामाजिक, सांस्कृतिक संकेत बदलत चालले आहे. म्हणजे नोकरीला लागला की, त्याला प्रतिष्ठा प्राप्त होते भलते ही शिपाई, कोतवालाची नोकरी असू दे म्हणतील हा सरकारचा जावई आहे म्हणजे त्याला कनिष्ठ श्रेणीच्या पदामुळे मान आहे इज्जत आहे परंतु इकडे पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या पीएच.डी झालेल्या मुला मुलीची किंमत त्यांच्या दृष्टीने शून्य आहे. आयुष्यभर शिकायलाच पदरी काहीच नाही स्वाभाविकच प्रतिष्ठेचा प्रश्न उभा राहतो हे शैक्षणिक दूर्भिष्य आहे. शासन व्यवस्थेच्या आड काठीचे हे दुष्परिणाम आहेत. असे शैक्षणिक पात्रता कमावून बसले त्या सुशिक्षित बेरोजगारांची संख्या लक्षावधीच्या घरात आहे. ही संख्या गणितीय पद्धतीने सतत वाढत आहे. यावर शासन मात्र चिडीचूप आहे. आम्ही भयंकाराच्या दरवाजात उभे आहोत. येथून कडेलोट होतोय की काय अशी स्थिती आहे. शासन स्तरावरून अनेक क्षेत्रामध्ये थांबविण्यात आलेली भरती प्रक्रिया परीक्षेतला अपारदर्शिपणा सेटलमेंट, पैसाखावू वृत्ती, भ्रष्टाचार प्रचंड बोकाळत आहे. प्राध्यापकांच्या जागेचा घोडे बाजार तर दिवसेंदिवस उसळी घेत आहे. संस्था मालकांचे उखळ पांढरे होत आहे. प्राध्यापकाच्या एका जागेचा रेट (वैश्याव्यवसायात हा शब्दोच्चार होतो) ऐंशी, नव्वद लाखाच्या पुढे अर्थात कोटी पर्यंत गेला आहे. रात्रंदिवस डोळे फोडून अभ्यास केलेल्या सर्व साधारण विद्यार्थी, संशोधकांने काय आपल्या कीडन्या विकून पैसा भरायचा का ? शिक्षण घेऊन या व्यवस्थेने किती लाचार बनविलयं स्वप्न घेऊन ध्येयाने खुणगाठ बांधून प्रामाणिक पणे अभ्यास केला विद्यापीठातून पदव्या घेतल्या त्याच करायचं काय ? कित्येक मुलं मुली एजबार झाले आहेत. त्या हजारो-लाखो मुला-मुलींनी समाजात तोंड कसे काढायचे ? त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे काय ? त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार त्याच्या हाताला कामाची हमी नसेल तर त्यांनी किती दिवस आईवडिलाच्या खांद्यावर आपलं ओझं ठेवायचे कधी त्याचं स्वप्न पूर्ण करायचं ? अरे निदान त्यांच्या मुला-मुलींच हात पिवळे झालेले तरी त्यांना बघू द्या त्यांचे डोळे मिटण्या आधी .... हे कार्यकलाप जर शिक्षणाने घटित होणार असतील तर अशा शिक्षणाचा उपयोग काय ? हा शिक्षणाचा दोष नाही आहे हे शैक्षणिक धोरण बनविणाऱ्या व राबविणाऱ्या मायबाप सरकारचा दोष आहे. शैक्षणिक व्यवस्थापन पूर्णत: कोलमडले आहे. कशाचा कशाला मेळ नाही हे जबाबदार सरकार नाही हे घोळकरू सरकार आहे. शैक्षणिक धोरणातील, त्यातील जी सत्वशीलता आहे. त्याला भंग करण्याचे कार्य ह्या धोरण बनविणाऱ्यांनी व राबविणाऱ्यांनी अंगीकारले आहे. मोठे चित्र-विचित्र अशी अवस्था वर्तमान स्थितीत झाली आहे. म्हणजे, फुले , शाहू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये जी व्यवस्था उभी केली तिला तडे देण्याच काम हल्ली मोठ्या प्रमाणात सुरू आहे. शैक्षणिक दिवाळखोरीला सुरूवात झाली आहे. सरकारी शाळा बंद होणं हे कशाच घोतक आहे ? म.जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज विद्वत्तेचा महामेरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणाची गंगा घरोघरी नेली. हे खरे शिक्षण महर्षी, शिक्षणसम्राट !महाविद्यालयांत व आपल्या स्वत:च्या शैक्षणिक संस्थाना आपल्या आजोबा, पणजोबाची नावे देऊन त्यालाच शिक्षण महर्षी, शिक्षण सम्राट अरे काय हा पानचटपणा !ह्यांची ही कुरणं सरकारनी आपल्या अधिपत्याखाली घेतली पाहिजेत परंतु ग्रामीण भागात एक म्हण आहे. 'ढवळ्या शेजारी पवळ्या बांधल्या वान नाही परंतु गुण लागला', असे आहेत हे चोर — चोर मसोरे भाई शैक्षणिक संस्था म्हणजे त्याचे कारखानेच! पुरोगामी महाराष्ट्राला हे लांछनास्पद आहे. अशा वेगळ्या शैक्षणिक अवस्थेचं चित्र असताना गुणवत्तेचा प्रश्न राहतोच कुठे ? आणि तो कुणाला विचारावा ? मनाला टोचणी देणारी, विदीर्ण करणारी अशी स्थिती शैक्षणिक व्यवस्थेची झालेली आहे. बाकीच्या क्षेत्रात काही कमी-जास्त झाले तर काही फार मोठी हानी होणार नाही; परंतु ही बौद्धिक हानी, हा अमूल्य वेळ, मुलांच्या भवितव्याचा प्रश्न तुम्ही कसा मार्गी लावणार आहात ? याच काय उपयोजन असणार आहे. वेळीच जर आपण सावरलो नाहीत तर पूर्णत: शिक्षण व्यवस्था कोसळणार आहे व त्याचे फार भयावह दुष्परिणाम आपणास भोगावे लागणार आहेत. भारताच भवितव्य अधोरेखित करणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे फार प्रसिद्ध कोट आहे. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो, ते प्राशन करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही" आपण अनेकांनी ते प्राशन केलं आहे वरील वाक्यामध्ये फार मोठा अर्थ दडलेला आहे. पुढे बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारणी सभेचं स्लोगन बनविले होते 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष, हा मूलमंत्र आहे. कशासाठी शिकायच हे लक्षात घ्या काळाची पाऊले ओळखा वेळीच जागृत व्हा आणि शिक्षण कार्यासाठी आपले योगदान द्या कारण शैक्षणिक वर्तमान धोक्यात आले आहे.

**डॉ. कोंडबा भगवान हाटकर,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. नं. 9552133951**